जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९०९ दिनांक - ३१/१२/२०२२**

## समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर

## सहा महीन्याच्या बाळाचा सहारा घेवुन,मोबाईल चोरी करणारी महीला समर्थ पोलीसांच्या जाळयात लाखो किंमतीचे मोबाईल जप्त

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे आदेशाने ३१ डिसेंबरच्या अनुशंगाने समर्थ पोलीस स्टेशन हददीत समर्थ पोस्टेचे सपोनि प्रसाद लोणारे, मपोउनि मिरा त्रंबके, मपोना रुपाली काळे व तपास पथकाचे अंमलदार असे पेट्रोलींग करीत असतांना मपोउनि मिरा त्रंबके यांना गोपनिय खबर मिळाली की, एक मोबाईल चोर महीला आपल्या सहा महीन्याच्या बाळाचा सहारा घेवुन चोरी करीत असल्याबाबत माहीती मिळाली त्यावरुन सदर महीलेस मपोउनि त्रंबके यांनी तिच्या बाळासह ताब्यात घेवुन चौकशी केली असता तिचेकडे विवीध कंपन्याचे १२ महागडे मोबाईल मिळुन आले. सदर मोबाईल बाबत तिचेकडे सखोल चौकशी केली असता तिने सदरचे मोबाईल रेल्वेमध्ये प्रवास करतांना व पुणे शहरामध्ये गर्दीचा फायदा घेवुन आपल्या लहान बाळाच्या सहा-याने चोरी केली असल्याची कबुली दिली.

सदरची महीला ही मुळची उत्तरप्रदेश मधील असुन सध्या तिचे वास्तव्य दिल्ली येथे आहे. आपल्या लहान बाळाला कडेवर घेवुन एखादया महीलेच्या मागे उभे राहुन तिचे पर्स मधुन सदरचे मोबाईल चोरी करीत होती. कडेवर लहान बाळ असल्याने तिचेवर कोणी संशय घेत नव्हते.सदरची महीला ही दिल्लीवरुन एखादया रेल्वेने प्रवास करीत होती व आपल्या बाळाच्या आडोश्याने महागडे मोबाईल चोरायचे.तसेच शहरामध्ये गर्दीचे ठिकाण पाहुन महीलांच्या पर्स मधुनही अश्याच प्रकारे मोबाईल चोरी करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.सदर महीलेकडुन एकुण विवीध कंपन्याचे १,४०,०००/-रु किंमतीचे १२ महागडे मोबाईल जप्त करण्यात आलेले आहे.सदर महीलेसोबत तिचे आणखी काही साथिदार असण्याची दाट शक्तता असुन पुढील तपास समर्थ पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग. श्री.राजेंद्र डहाळे,मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १ पुणे शहर,श्री.संदीप सिंह गिल्ल,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग, पुणे श्री.सतिश गोवेकर,यांचे मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,समर्थ पो.स्टे, श्री.रमेश साठे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे) श्री.प्रमोद वाघमारे, यांचे सुचनेनुसार तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे,मपोउनि मिरा त्रंबके, मपोना रुपाली काळे,पोलीस अंमलदार हेमंत पेरणे,रहिम शेख,कल्याण बोराडे,दत्तात्रय भोसले,गणेश वायकर,प्रमोद जगताप,रोहीदास वाघीरे,सुभाष पिंगळे,श्याम सुर्यवंशी,यांनी केली आहे.


NATIONAL HELPLINE FOR SENIOR CITIZENS
JANASEVA FOUNDATION
NATIONAL HELPLINE CENTRE, PUNE, MAHARASHTRA
समर्थ
फोन नं.
२६०६५४९१/२६२०८२२४.